महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

दुरध्वनी क्रमांक - 0257- 2220152 ई मेल आयडी - homebranchjalgaon@gmail.com

क्रमांक. दंडप्र/01/ कावि/2020/ 343 दिनांक :- 02/07/2020

**विषय :- कोव्हिड-19 चाचणी पॉझिटीव्ह आलेल्या अति सौम्य किंवा लक्षणे नसलेल्या (Asymptomatic) व्यक्तींसाठी घरी करावयाच्या विलगीकरणाविषयी मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ** —महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.करोना-2020/प्र.क्र.58/आरोग्य-5 दिनांक 06/06/2020

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.करोना-2020/प्र.क्र.58/आरोग्य-5 दिनांक 06/06/2020 नुसार प्रतिबंधित कालावधींमध्ये रुग्णांना वैद्यकीय दृष्टया लक्षणानुसार लक्षण नसलेले /सौम्य वा अतिसौम् लक्षणे, मध्यम तीव्र लक्षणे व तीव्र लक्षणांमध्ये वर्गीकृत करावयाचे असून , त्यानुसार रुग्णांना अनुक्रमे अ) कोव्हिड केअर सेंटर (CCC) , ब) डेडिकेटेड कोव्हिड केअर सेंटर (DCHC) व क) डेडिकेटेड कोव्हिड हॉस्पीटल (DCH) येथे दाखल करावयाचे आहे. तथापि, अति सौम्य किंवा लक्षणे नसलेल्या कोव्हिड पॉझिटीव्ह रुग्णांना जर त्यांचे घरामध्ये योग्य प्रकारे सुविधा उपलब्ध असतील तर त्यांचे संमतीनुसार घरी विलगीकरणाचा पर्याय (Home Isolation) उपलब्ध करुन देता येईल. याकरिता खालील प्रमाणे मार्गदर्शक् सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) **गृह विलगीकरणासाठीची पात्रता —**

- गृह विलगीकरणासाठी परवानगी मागणाऱ्या कोव्हिड -19 पॉझिटीव्ह व्यक्तीच्या घरामध्ये केवळ एकच कुटुंब (Single Family) वास्तव्यास असावे. अलगीकरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होणेकरीता सदर व्यक्तीच्या घरामध्ये स्वतंत्र शौचालय व बाथरुम सुविधा असणा-या किमान 2 स्वतंत्र बेडरुम सह किमान 4 स्वतंत्र खोल्या असणे

आवश्यक असेल. याबाबतची खातरजमा संबंधित कार्यक्षेत्रातील तलाठी/ग्रामसेवक व आरोग्य सेवक यांनी संयुक्तरित्या करावी व त्याचा अहवाल जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त म.न.पा यांना तसेच उर्वरित क्षेत्रातील संबंधित तहसीलदार तथा Incident Commander यांना सादर करावा.

- स्वतंत्र गृह विलगीकरणासाठी परवानगी मागणाऱ्या व्यक्तीला त्याच्या घराच्या दोन्ही बाजूस राहणाऱ्या कुटुंबांचे , अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या व्यक्तीच्या संबंधित मजल्यावरील इतर शेजारील कुटुंबांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
- उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णास अति सौम्य किंवा लक्षणे नसल्याबद्दल वैद्यकीय दृष्ट्या प्रमाणित केलेले असावे.
- संबंधित रुग्णांच्या घरी त्यांच्या विलगीकरणासाठी तसेच कुटुंबातील व्यक्तीकरिता अलगीकरणासाठी (Home Quarantine) योग्य सोई-सुविधा उपलब्ध असाव्यात.
- घरी दिवस –रात्र (24 x 7 ) काळजी घेणारी व्यक्ती उपलब्ध असावी. संबंधित काळजीवाहू व्यक्ती व उपचार देणारे रुग्णालय यांच्यामध्ये संपर्क व्यवस्था (दूरध्वनी/मोबाईल) उपलब्ध असणे अनिवार्य आहे.
- वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार काळजीवाहू व्यक्ती व सर्व निकट संपर्कातील व्यक्तींनी प्रोटोकॉलनुसार हायड्रॉक्सी क्लोरोक्विनची मात्रा घ्यावी.
- मोबाईलवर " **आरोग्य सेतू** " ॲप डाऊनलोड करावे व ते सतत ॲक्टिव्ह (Bluetooth/Wi-fiद्वारे) असेल याविषयी दक्ष रहावे.

  (Link: www.mygov.in/aarogya-setu-app)
- रुग्णांनी स्वत:ची काळजी घेणे व नियमितपणे प्रकृतीबाबत पाठपुराव्याविषयी जिल्हा सर्वेक्षण अधिकारी/सर्वेक्षण पथकास माहिती देणे अनिवार्य आहे.
- रुग्णांने स्वत:चे गृह विलगीकरण करण्याविषयी प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-1) भरुन द्यावे व सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. प्रतिज्ञापत्र दिल्यांनतर सदरील व्यक्तीस गृह विलगीकरणासाठी पात्र ठरविण्यात येईल.
- धाप लागणे/श्वासोच्छवास अडथळा निर्माण होणे, छातीमध्ये सतत दुखणे/वेदना होणे, संभ्रमावस्था/शुध्द हरपणे, ओठ/चेहरा निळसर पडणे, इ.पैकी कोणतेही गंभीर

लक्षणे/चिन्हे आढळून आल्यास त्वरीत वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सल्यानुसार संदर्भ सेवेची मदत घ्यावी.

- कोव्हिड पॉझिटीव्ह रुग्णांनी गृह विलगीकरणासाठी यासोबतचे परिशिष्ट -1 मध्ये नमूद केलेप्रमाणे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
- तसेच कोव्हिड पॉझिटीव्ह रुग्णांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींनी यासोबत जोडलेल्या परिशिष्ट -2 मधील सूचनांचे पालन करावे.
- वर नमूद सर्व अटी व शर्तीचे पालन करणाऱ्या व्यक्तींना **जळगांव शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आयुक्त तथा Incident Commander,** महानगरपालिका, जळगांव यांनी परवानगी देण्याची कार्यवाही करावी. तसेच उर्वरित **जळगांव जिल्हयाकरिता संबंधित तहसीलदार तथा Incident Commander** यांनी गृह विलगीकरणासाठी परवानगी देण्याची कार्यवाही करावी.

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद जळगांव यांना माहितीसाठी
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक,जळगांव यांना माहितीसाठी
प्रत :- आयुक्त तथा Incident Commander, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जळगांव यांना माहितीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकित्सक,जळगांव यांना माहितीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी तथा Incident Commander (सर्व)
प्रत :- तहसिलदार तथा Incident Commander (सर्व)
प्रत :- मुख्याधिकारी ,नगरपालिका/नगरपंचायत सर्व
प्रत :- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जळगांव
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव यांनी सदर आदेशाचे स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य व्यापक प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

परिशिष्ट - १

प्रतिज्ञापत्र

गृहविलगीकरण

माझे नांव ................................................................ असून, मी ............................................................ येथील रहिवाशी आहे.

माझे कोवीड-१९ आजाराचे पॉझिटीव्ह निदान झाले असून, या प्रतिज्ञापत्राद्वारे स्वेच्छेने विहित कालावधीसाठी पुर्ण वेळ काटेकोरपणे गृह विलगीकरण करुन घेईन. या कालावधीत मी स्वतःची आणि माझ्या निकट संपर्कातील व्यक्तींच्या आरोग्यांवर लक्ष ठेवेन. जर माझ्यामध्ये आजाराची गंभीर लक्षणे / चिन्हे आढळून आली अथवा माझ्या संपर्कातील व्यक्तींमध्ये कोवीड-१९ आजाराची कोणतीही लक्षणे आढळून आली तर, त्वरित नियुक्त केलेल्या सर्व्हेक्षण पथक / नियंत्रण कक्षाशी संपर्क करेन.

गृह विलगीकरण करताना मला कोणती काळजी घ्यावी लागेल, याबद्दल आरोग्य विभागाकडून सविस्तरपणे सांगितले गेले आहे.

गृह विलगीकरणाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन न केल्यास मी विहित कायदयानुसार कारवाईस पात्र असेन.

स्वाक्षरी -

दिनांक -

संपर्क क्रमांक -

परिशिष्ट - २

रुग्णांची काळजी घेणाऱ्या व्यक्तीसाठी सुचना -

- मास्क (मुखवटा) - आजारी व्यक्तीच्या रुममध्ये, काळजी घेणाऱ्या व्यक्तीने ३ पदरी मास्क वापरणे गरजेचे आहे. वापर करत असताना मास्कच्या पुढील भागास स्पर्श करु नये. जर मास्क ओला किंवा घामामुळे खराब झाल्यास, ताबडतोब बदलणे. मास्कची वापरानंतर योग्य प्रकारे विल्हेवाट लावून हात सॅनिटायझरने स्वच्छ करावेत.
- त्याने/तिने स्वतःच्या चेहरा, नाक किंवा तोंडास स्पर्श करणे टाळावे.
- आजारी व्यक्ती किंवा त्याच्या सभोवतालच्या वस्तूंशी संपर्क आल्यानंतर काळजी घेणाऱ्या व्यक्तीने स्वतःच्या हाताची स्वच्छता साबण व पाण्याने करावी.
- हाताची स्वच्छता - अन्न शिजवण्यापूर्वी व शिजल्यानंतर, जेवणापूर्वी व जेवणानंतर तसेच शौचालयाचा वापर झाल्यानंतर व जेव्हा जेव्हा हात अस्वच्छ होतील तेव्हा साबण व पाण्याने कमीत कमी ४० सेकंद हात स्वच्छ करावेत. जर हात कोरडे असतील तर अल्कोहोल मिश्रित आधारीत सॅनिटायझरचा वापर करुन हात स्वच्छ करावेत.
- साबण व पाण्याने हात स्वच्छ केल्यानंतर ते टिश्यू पेपरने कोरडे करावेत, टिश्यू पेपर उपलब्ध नसल्यास, स्वच्छ टॉवेलचा वापर करावा व टॉवेल ओला झाल्यास बदलावा.
- रुग्णांशी संपर्क - रुग्णांच्या शारीरीक स्त्रावाशी मुख्यतः थुंकी किंवा श्वसन मार्गातून उत्पन्न होणाऱ्या स्त्रावांशी थेट संपर्क टाळावा.
- रुग्णाच्या संपर्कात आलेल्या सभोवतालच्या वस्तूंशी (उदा- रुग्ण घेत असलेले सिगारेट, वापरत असलेली भांडी, पेय जल, टॉवेल्स व आंथरुण) यांचा थेट संपर्क टाळावा.
- रुग्णाला त्याच्याच खोलीत अन्न पुरवणे आवश्यक आहे.

- रुग्णांनी वापरलेली भांडी, डिश व टॉवेल्स हे सर्व साबण/डिटर्जंट आणि पाण्याने स्वच्छ करावेत. भांडी, डिश, टॉवेल्स स्वच्छ केल्यानंतर पुन्हा वापरले जाऊ शकतात. हातमोजे काढल्यानंतर किंवा वापरलेल्या वस्तू हाताळल्लेनंतर हात स्वच्छ धुवावेत.
- तीन पदरी मेडिकल मास्क व डिस्पोजेबल ग्लोव्हजचा वापर – साफसफाई करताना किंवा रुग्णांनी वापरलेल्या पृष्ठभागाची किंवा त्यांच्या कपड्यांची स्वच्छता करताना ट्रिपल लेअर मास्कचा वापर करावा. हातमोजे घालण्यापूर्वी किंवा काढलेनंतर हाताची स्वच्छता करावी.
- काळजी घेणाऱ्या व्यक्तींनी रुग्ण वेळेवर औषधोपचार घेत असल्याची खात्री करावी.
- रुग्णाच्या संपर्कात आलेले सर्व व्यक्ती व रुग्णाची काळजी घेणाऱ्या व्यक्तीनीं त्यांच्या आरोग्याचे स्वपरीक्षण करावे. दररोज तापमान व कोवीड-१९ आजाराची लक्षणे (उदा- ताप, खोकला व श्वासोच्छ्वासास त्रास) आढळल्यास तात्काळ सदरील वैद्यकिय अधिकाऱ्यांना संपर्क साधावा.

रुग्णांसाठी सुचना –

- रुग्णानी नियमित ट्रिपल लेयर मेडिकल मास्कचा वापर करावा. तासाच्या वापरानंतर किंवा त्याअगोदरच ओला झाला असेल तर मास्क काढून टाकावा.
- मास्कची १% सोडीयम हायपोक्लोराईटच्या साहाय्याने निर्जुंतुकीकरण केल्यानंतरच विल्हेवाट लावावी.
- रुग्णांनी त्याला नेमून दिलेल्या खोलीमध्येचं राहणे बंधनकारक असून रुग्णांनी घरातील इतर व्यक्ती विशेषत: जेष्ठ नागरीक, उच्च रक्तदाब, हृदयविकार व किडनी विकार असलेल्या व्यक्तींपासून दूर रहावे.
- रुग्णांनी पुरेशी झोप व जास्तीत जास्त द्रव पदार्थाचे सेवन करावे. जेणेकरुन शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित राहील.

जिल्हा दंडाधिकारी जालना

- रुग्णांनी उघड्यावर खोकू अथवा थुंकु नये.
- रुग्णांनी आपल्या हाताची स्वच्छता साबण व पाण्याने कमीत कमी ४० सेकंद किंवा अल्कोहोल मिश्रित सॅनिटायझरने करावी.
- रुग्णांनी स्वतःच्या वस्तूचा संपर्क इतर व्यक्तीशीं येणार नाही याची काळजी घ्यावी.
- रुग्णांचे रुममधील टाईल्स (पृष्ठभाग) व वारंवार स्पर्श होणाऱ्या (उदा–टेबल टॉप्स, डोअर नॉब्स, हॅण्डल इ.) १% सोडीअम हायपोक्लोराईट द्रावणाने स्वच्छ करावे.
- डॉक्टरांनी दिलेल्या सुचना व औषधोपचाराचे रुग्णांनी तंतोतंत पालन करावे.
- रुग्णांनी स्वतःच्या आरोग्याचे स्वपरीक्षण दररोज तापमानाचे नोंद घेऊन करावे व कोवीड–१९ आजाराची कोणतीही लक्षणे आढळल्यास त्याची माहिती संबधित आरोग्य यंत्रणेला दयावी.